# जाहिरात मसुदा – महापालिका संकेतस्थळ

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### विषय - दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या ( हंगामी ) स्वरूपात पद भरणेबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाचे ठिकाणी दरमाहे एकत्रित मानधनावर खाली नमूद केलेल्या पदांसाठी (हंगामी) तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरिता मुलाखत पद्धतीने नेमणूक करावयाची आहे.सदर पदांचे पदनाम , पदसंख्या , शैक्षणिक अर्हता , अनुभव आणि अटी खालील प्रमाणे :

क्यूरेटर ( वर्ग 2) :- ( पदसंख्या -१ )

Qualifications:

1. Bachelor Degree in Veterinary Science or Masters degree / P.H.D in zoology/wildlife sciences.
2. Able to speak, English,hindi & regional language in which zoo is situated.
3. Captive animal management experience or qualification (certificate, diploma degree level)
4. Thorough understanding of wild animals health care;
5. Experience and/or knowledge in design and construction of facilities for captive wild animals with emphasis on structural integrity and safety aspects to workers and wild animals.
6. Project management skill and or experience.
7. Personnel supervisor experience.
8. Proficiency in Microsoft office processing (including excel ,work, power point program )
9. Experience in public speaking/presentation.
10. Ability to write field reports, operational manuals and review scientific grant proposal writing and/or fundraising experience.
11. Experience of working in any zoo will be preferred.

अटी आणि शर्ती

१.मानधनावरील नेमणुका पूर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी म. न. पा. स सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३) मुलाखतीस येण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदासाठी विहित केल्यानुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा करण्यात येईल.

५) सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता , जातीचे प्रमाणपात्र व अनुभवांबाबतच्या आवश्यक त्या प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका ( मार्कशीट) , सिर्टीफिकेट , फोटो . इ. सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणूक रद्द करणेत येईल.

७) सदर पदास महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील. आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झालेस सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नेमणूक करणेत येईल.

८) उमेदवारांना प्राणिसंग्रहालयाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्या मध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही.

Scanned by CamScanner

९) उमेदवारांची नेमणूक झाल्यानंतर बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी नोंदविणे बंधन कारक राहील व हजेरी मस्टर वर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्या शिवाय पगार अदा केला जाणार नाही.

१०) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. सदर नेमणूक प्रक्रिया रद्द / फेरप्रक्रिया करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांनी राखून ठेवले आहेत.

तरी इच्छुक उमेदवारांनी अर्जासह बायोडेटा शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवांबाबतच्या आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या प्रती.उदा गुणपत्रिका(मार्कशीट ), सर्टिफिकेट , फोटो , इत्यादी Walk In Interview करिता वार सोमवार दिनांक १९/०८/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.आयुक्त कक्ष ४ था मजला पिं.चिं.मनपा, पिंपरी-१८ येथे उपस्थित रहावे. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.तसचे आलेल्या उमेदवारांचे रजिस्ट्रेशन मुलाखतीचे दिवशी सकाळी १०.०० ते ११.०० यावेळेत केले जाईल. मुलाखतीनंतर/वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -१८

Scanned by CamScanner